# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | विभागाचे नाव | आक्षेप क्रमांक | पान.नं. |
|---|---|---|---|
| ०१ | लेखा विभाग | १,२,३,४,५,६,७,८ | १-७ |
| ०२ | राष्ट्रीय उपजिविका अभियान योजना विभाग | ९,१०,११ | ८-९ |
| ०३ | सामान्य प्रशासन विभाग | १२,१३ | १०-११ |
| ०४ | प्रभाग समिती कार्यालय - १ | १४ | १२ |
| ०५ | प्रभाग समिती कार्यालय - २ | १५ | १३ |
| ०६ | प्रभाग समिती कार्यालय - ३ | १६ | १४ |
| ०७ | प्रभाग समिती कार्यालय - ४ | १७ | १५ |
| ०८ | अग्निशमन विभाग | १८,१९,२० | १६-१७ |
| ०९ | पाणी पुरवठा विभाग | २१,२२,२३,२४ | १८-२१ |
| १० | स्थानिक संस्था कर विभाग | २५ | २२ |
| ११ | विधी विभाग | २६ | २३ |
| १२ | कर विभाग | २७,२८,२९ | २४-२७ |
| १३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ३० | २८-२९ |
| १४ | वैदयकीयआरोग्य विभाग | ३१ | ३० |
| १५ | नगररचना विभाग | ३२ | ३१ |
| १६ | मालमत्ता विभाग | ३३ | ३२ |
| १७ | शिक्षण मंडळ | ३४ | ३३ |
| १८ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ३५ | ३४ |
| १९ | अनधिकृत बांधकाम विभाग | ३६ | ३५ |
| २० | विदयुत विभाग | ३७ | ३६ |
| २१ | महिला बालकल्याण विभाग | ३८ | ३७ |
| २२ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ३९,४०,४१,४२,४३ | ३८-४० |
| २३ | सुरक्षा रक्षक विभाग | ४४ | ४१ |
| २४ | भांडार विभाग | ४५,४६,४७ | ४२-४४ |
| २५ | वाहन विभाग | ४८,४९,५०,५१,५२ | ४५-४९ |

# सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६ (३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर नगरपालिका मुख्य लेखापरिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल मा. स्थायी समिती पुढे ठेवण्यासाठी सादर करत आहे.

**प्रस्तावना:-**

उल्हासनगर महानगरपालिका २१/१०/१९९६ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी लेखापरिक्षण महाराष्ट्र शासनाने संचालनालय, लेखा व कोषागारे यांचेकडील मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखापरिक्षकामार्फत होत आहे. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखा परिक्षण महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षकामार्फत होत आहे. त्यानुसार जमा रकमांचे लेखापरिक्षण व खर्चाचे पूर्व लेखा परिक्षण केले जात आहे. पूर्व लेखा परिक्षणामुळे काम सुरु होण्यापूर्वीच अनियमितता निदर्शनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर थांबवता येतो.

उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखा परिक्षक, उप-मुख्य लेखा परिक्षक, सहा. मुख्य लेखा परिक्षक, तसेच ३ लिपिक असा कर्मचारी वर्ग देण्यात आला होता. त्यामधील १ लिपिक हया १४२, विधानसभा मतदार केंद्र, कल्याण "ड" वार्डात, उल्हासनगर ४ परिसरात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी महणुन काम करीत असते, १ लिपिक संगणक ऑपरेटरचे काम करतात व १ लिपिक आवक-जावकाचे कामकाज करतात. त्यामुळे लेखापरिक्षणाचे काम निर्धारित वेळेत करता आले नाही, सामान्य प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी स्वरुपात अनुभवी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेस कळवूनही पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. याबाबींचा परिणाम लेखापरिक्षणावर झालेला आहे. व त्यामुळे लेखापरिक्षण अहवाल विलंबाने सादर होत आहे.

प्राथमिक लेखापरिक्षणाच्या दृष्टीकोणातून कार्यालयीन कामकाजामध्ये व लेख्यांमध्ये त्रुटी आढळतात. पुन्हा पुन्हा होऊ नये व कामामध्ये सुरळीतपणा, नियमितपणा तसेच मनपाच्या पैशाचा अपहार व गैरव्यवहार, गैरवापर टाळणे या

उद्देशाने अंतर्गत लेखापरिक्षणास आढळून आलेल्या आक्षेपांचे बाबतीत संबंधित विभाग प्रमुखांनी दखल घेवून योग्य ती कार्यवाही त्वरित करुन अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

परिशिष्ठ क्र. (१) स्थानिक निधी लेखा कार्यालयाच्या सन २०१७-१८ अखेर प्रलंबित लेखा परिक्षण परिच्छेदाची अदयावत माहिती.

| आरंभिचे एकुण परिच्छेद | एकुण वगळण्यात आलेले परिच्छेद | शिल्लक परिच्छेद |
|---|---|---|
| ६१४ | ०८ | ६०६ |

परिशिष्ठ क्र. (२) क्रेंद सरकारच्या महालेखा परिक्षक कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालाबाबत.

महालेखापाल मुंबई यांचेकडून आपल्या महानगरपालिकेचे लेखापरिक्षण दर ०३ वर्षांनी होत आहे.

| आरंभिची शिल्लक सन २०१७-१८ पर्यंत | महालेखापरिक्षक कार्यालयाने काढलेल्या परिच्छेदांची संख्या | निरिक्षण अहवालाची संख्या | अनुपालन मान्यतेनंतर वगळण्यात आलेल्या परिच्छेंदाची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| २२५ | - | २२५ | - | २२५ |

स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, कोकणभवन व महालेखापाल, मुंबई कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार काही विभागांनी अनुपालन सादर केलेले आहे. सदर अनुपालन स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, कोकणभवन व महालेखापाल यांनी अदयाप मान्य केलेले नाही. त्यामुळे वरिल प्रमाणे परिच्छेद प्रलंबित आहेत.

# घोषणापत्र

लेखा परिक्षण विभाग उल्हासनगर महानगरपालिका यामाफर्त महानगरपालिकेच्या विविध विभागांचे सन २०१७-१८ या कालावधीचे अंतर्गत लेखा परिक्षण करण्यात आले. सदरचे लेखापरिक्षण हे केवळ संबंधित विभागांनी उपलब्ध केलेल्या नस्ती, लेखा, दस्तऐवज यांचे आधारे करणेत आले.

# लेखा विभाग

परिच्छेद क्रमांक १:- अंदाजपत्रकाचा बाबत

१) मागील तीन वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज व वस्तूस्थिती:-

मागील तीन वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व वार्षिक लेख्यानुसार प्रत्यक्ष जमाखर्च पाहिले असता खालील प्रमाणे वस्तूस्थिती दिसून येते.

जमा बाजू

(आकडे पुर्ण रूपयात)

| अ. क्र. | वर्ष | आयुक्तांचे अंदाजपत्रक | स्थायी सिमितीचे अंदाजपत्रक | महासभचे अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ४८६३४३५००० | ६३६९४१५००० | ६३८९४१५००० | २९२२२५३००० |
| २ | २०१५-१६ | ४००१८०७००० | ५९८७६५०००० | ६२६२८३२००० | ३२१८४९१००० |
| ३ | २०१६-१७ | ५३५६९७०००० | ७२०१९७०००० | ७४०१९७०००० | ३८०२१८३००० |

खर्च बाजू

| अ. क्र.. | वर्ष | आयुक्तांचे अंदाजपत्रक | स्थायी सिमितीचे अंदाजपत्रक | महासभचे अंदाजपत्रक | प्रत्यक्ष जमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ५६६२४१२००० | ६३६०८१२००० | ६३८०८१२००० | २५४९८२०००० |
| २ | २०१५-१६ | ४७९९०२०००० | ५९८५४२०००० | ६२५८५२०००० | २९५५४२१००० |
| ३ | २०१६-१७ | ६०७२९७६००० | ७१९६१७६००० | ७३९६१७६००० | २९६१३३१००० |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रशासनाने तयार केलेल्या अंदाजपत्रकामध्ये स्थायी समिती व महापालिका सभेच्या स्तरावर मोठया प्रमाणात वाढ करण्यात आलेली आहे. प्रशासनाचे तयार केलेले अंदाजपत्रक तयार करताना ही नियोजनाचा काही अंशी अभाव दिसून येतो. अंदाजपत्रक तयार करताना मागील वर्षात निर्माण झालेली दायित्व निभावण्यासाठी पुरेशा तरतुदी अंदाजपत्रकात नमुद केलेल्या नाहीत.

प्रत्येक वर्षा प्रमाणे मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, ॲकोमोडेशन रिझरवेशन मालमत्ता विनियोग करण्यात येईल असे गृहित धरुन अवास्तविक अंदाजपत्रक तयार करण्यात आल्याचे दिसते. तथापि त्यानुसार प्रत्यक्षात उत्पन्न प्राप्त होत नाही. प्रत्येक वर्षात उत्पन्नाचे अ वास्तविक अंदाज ग्रहित धरुन विविध लेखा शीर्षातंर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येतात. वर्षाअखेर उत्पन्नाचे अ वास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही. प्रत्येक्ष जमा व खर्च यांचा अचुक मेळ घेवुन अंदाज पत्रक तयार करणे आवश्यक आहे. जेणे करून महानगर पालिकेला काही वर्षापासून थकीत असलेल्या कर्जाची अदायगी करणे शक्य होईल व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत जाणार नाही यांची दक्षता घेवुनच अंदाज पत्रक सादर करणे आवश्यक आहे . परंतु मागील तीन वर्षाची सरासरी जमा व खर्च यांच्या ताळमेळ पहाता अवास्तव अंदाज पत्रक सादर करण्यात आल्याचे दिसुन येते.

**परिच्छेद क्रमांक २:- दायित्व बाबत .**

१) महानगरपालिकेचे कोसळलेले आर्थिक नियोजन संभाळण्यासाठी कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कमही वापरल्याची गंभीर बाब दिसून आलेली आहे. सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचे लाभ पूर्णपणे महानगरपालिका देऊ शकत नाही त्याचेही दायित्व प्रलंबित आहे.

२) संकलित करासोबत वसूल केला जाणारा शिक्षण कर, रोजगार हमी कर आणि मोठया मिळकती वरील कर यांच्याही रकमा महानगरपालिकेने शासनाकडे वेळच्यावेळी भरलेल्या नाहीत. वास्तविक पाहता या गंभीर अनियमितता असून यावर तात्काळ उपाय योजना करणे आवश्यक आहे.

३) घनकचरा व्यवस्थापनाबाबत न्यायालयात सुरु असलेली प्रकरणे व किमान वेतन नियमानुसार देय रकमांचा विचार करता आणखी मोठे दायित्व निर्माण होणार आहे.

४) महानगरपालिकेकडे बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत म्हणून ठेकेदारांनी जमा केलेल्या रकमा वेगळया सुरक्षित ठेवणे अपेक्षित आहे. मात्र यातूनही खर्च केल्याची गंभीर बाब समोर येत आहे.

५) महानगरपालिकेकडे घसारा निधी व इतर आवश्यक राखीव निधी ठेवण्यात आलेले नाहीत.

**परिच्छेद क्रमांक ३:- परिभाषित पेंशन योगदान योजना (DCPS):-**

एप्रिल-१९ पासून शासन १४ % १ नोव्हेंबर २००५ पासून शासनाने पूर्वीची सेवा निवृत्त वेतन योजना बंद केली असून परिभाषित सेवानिवृत्ती योजना (DCPS) सुरु केली आहे. या योजनेनुसार कर्मचा-यांच्या वेतनातून परिभाषित सेवानिवृत्ती योजनेसाठी १० टक्के रक्कम कपात करण्यात येते. तेवढीच रक्कम महानगरपालिकेने सदरच्या खात्यात भरावयाचे असून शासन निश्चित करेल अशा प्रकारचा व्याज दरही त्यावर अनुज्ञेय आहे.सदयस्थितीत हा दर ८ टक्के आहे. कर्मचा-यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या रकमा अनुसूचित बँकेत मुदतीत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यात येतात. तथापि बँकांचा व्याजदर कमी असल्याने कर्मचा-यांना देय ठरणा-या व्याजाच्या रकमेतील फरकाची रक्कम महानगरपालिका निधितून वर्ग करावी लागते. सदयस्थितीत बँकांचा व्याजदर अंदजे ७ टक्के आहे . या कारणास्त्व परिभाषित सेवानिवृत्ती योजना(DCPS) निधीत अंदाजे १.५० कोटी रुपयांची तूट आहे. सदर तूट विहित मुदतीत भरुन काढण्यासाठी महापालिका निधीतून रक्कम वर्ग करणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक ४:- वार्षिक उत्पन्न व बांधिल खर्चाचे तपशील**

उल्हासनगर महानगरपालिकेस २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्राप्त होणाऱ्या वास्तविक वार्षिक उत्पन्न व बांधिल खर्चाचे तपशिल पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | वार्षिक उत्पन्न | अ.क्र. | तपशिल | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Op.Bal.<br>आरंभीची शिल्लक | 8409 | 1 | Salary | 7792 |
| | | | 2 | Pen.& S.R. Funds | 2160 |
| | | | 3 | Allowances | 441 |
| 2 | LBT<br>स्था.स.कर | 875 | 4 | Adm.Exp | 1051 |
| | | | 5 | Midc | 2000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 6 | MWSSB Arrears | 198 |
| 3 | Prop.Tax मालमत्ता कर | 642 | 7 | Und.Drng.Loan repay | 0 |
| | | | 8 | W.S. sch. Loan repay | 0 |
| | | | 9 | MMRDA Loan repay | 229 |
| 4 | W.S.(Tax) पाणी पुरवठा(कर) | 2968 | 10 | Amrut Loan repay | 839 |
| | | | 11 | St.Engergy Charg. | 594 |
| | | | 12 | St.Light (maint) | 86 |
| 5 | W.S.(Ws) पाणी पुरवठा(पा.पु.) | 101 | 13 | St.Light (Cap.) | 47 |
| | | | 14 | PHD(maint) | 2249 |
| | | | 15 | PHD(Cap.) | 43 |
| 6 | Grants अनुदाने | 19837 | 16 | PWD(maint) | 1121 |
| | | | 17 | PWD(Cap.) | 3864 |
| | | | 18 | Ward com.(A-bud) | 873 |
| 7 | Rec. (MRTP) विशेष अधि.वसुली | 120 | 19 | Ward com.(C-bud) | 16 |
| | | | 20 | Garden(maint) | 250 |
| 8 | InfrastuctureFund | 00 | 21 | Garden(Cap.) | 83 |
| | | | 22 | Fire fight(maint) | 37 |
| 9 | Mpl. Prop मपा. मालमत्ता उत्पन्न | 76 | 23 | Fire fight(Cap.) | 9 |
| | | | 24 | Hosp.Disp( maint.) | 48 |
| 10 | Dispensary दवाखाने | 06 | 25 | Hosp.Disp(Cap.) | 1 |
| | | | 26 | Elec & Tel-WS | 270 |
| 11 | License Fee परवाना फी | 194 | 27 | W.Sup (maint) | 682 |
| | | | 28 | W.Sup (Cap.) | 423 |
| 12 | Misc इतर | 590 | 29 | Und. Grnd. Drng (maint) | 124 |
| | | | 30 | Und. Grnd. Drng(Cap.) | 119 |
| | | | 31 | Drainage(maint) | 270 |
| 13 | Loans कर्ज | 00 | 32 | Drainage(Cap.) | 639 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 33 | School Board | 4893 |
| 14 | Ext. Ord Hds. असाधारण लेखे | 195 | 34 | Women/ Child walfare | 311 |
| | | | 35 | Vehcls.computers | 64 |
| | | | 36 | Misc | 1050 |
| 15 | JNNURM875 | 772 | 37 | Ext.Ord.heads | 628 |
| | | | 38 | JNNURM | 3 |
| | एकुण उत्पन्न | 40585 | | एकुण खर्च | 33507 |
| | | | | शिल्लक | 7078 |

(आकडे लाखात)

उपरोक्त तक्ता पहाता उल्हासनगर महानगरपालिकेस बांधिल खर्च केल्यानंतर संपूर्ण वर्षात केवळ अंदाजे रुपये ७०.७७ उपलब्ध होवू शकतात. सदर रक्कम प्रलंबित देयकांसाठी ही पर्याप्त होणार नाही. एकंदरीत वरील वस्तुस्थितीचे अवलोकन करता दि.३१ मार्च २०१८ अखेर पर्यंत रुपये २१.९८ कोटी अंदाजे एम.आय.डी.सी. चे इतके दायित्व असून त्यासाठी ढोबळ मनाने केवळ एका वर्षामध्ये रुपये ४८.७९ इतका निधी उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे नव्याने विकास कामे सुचवून अथवा विकास कामे करुन आणखी दायित्व निर्माण करणे महानगरपालिकेला आणखी आर्थिक अडचणीत आणणारे ठरेल.

**परिच्छेद क्रमांक ५:-** लेखा विभागाचे लेखा परिक्षण करताना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना जमा झालेल्या अंशदानावर व्याज देणे बाबत.

श्रीमती लता गुलाब बेहनवाल सफाई कामगार कॅम्प नं.५ या कर्मचा-याचे सन २०१७-१८ या वर्षाकरिता चे एकूण जमा रक्कमेवर येणारे व्याज दर चुकीचे दाखविलेले आहे.

एकूण जमा रक्कम- ३८,८६,२९६/-

मिळणारे व्याज- १८८३/- एवढेच दाखवण्यात आलेले आहे.

नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना जमा झालेल्या अंशदानावर व्याज देण्यात आलेली फाईल तपासताना सन जानेवारी , २०१८ ते मार्च, २०१८ या कालावधी करिता व्याज दर ८.०० टक्के लिहिलेला दिसून येतो. प्रत्यक्षात फाईल मध्ये देताना ७.६० टक्के दिलेला आहे. ही दुरुस्ती करण्यात यावी.

**परिच्छेद क्रमांक ०६:- लेखा विभागाचे लेखे व्दिनोंद पध्दतीत न ठेवले बाबत**

शासन निर्णय नगरविकास विभाग, मंत्रालय, क्र.लेखास-१०२००/प्रक्र५/नवि३१ दि.०६/०७/२००५ नुसार महानगरपालिकेने दि.०१/०४/२००५ पासून लेखे व्दिनोंद पध्दतीने ठेवण्याबाबत आदेशित केले आहे.

लेखा विभागातील निधीची रोखवही तसेच इतर रोखवहया एकेरी नोंद पध्दतीने ठेवल्याचे दिसून आले आहे. नागरी प्रशासनास सुधारणा घडवून आणणे व स्थानिक स्वराज्य संस्थांना आर्थिक दृष्टया सक्षम बनविणे व त्यांची बाजारातील पत सुधारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र शासनाने ज्या सुधारणा करणे बंधनकारक केले आहे. त्यातील अनिवार्य सुधारणांमध्ये महानगरपालिकांनी आधुनिक व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवणे बाबत अंतर्भूत आहे. परंतू लेखा विभागाने व्दिनोंद पध्दतीने लेखे ठेवल्याचे दिसून आले नाही.

**परिच्छेद क्रमांक०७:- कुटुंबनिवृत्ती वेतनातील अनियमितता**

१. कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांचे नोंद वही ठेवण्यात आलेली नाही, तसेच कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांना प्रदान करण्यात येत असलेले निवृत्ती वेतनाची पडताळणी केली असता ६व्या वेतन आयोगानुसार कुटुंबनिवृत्ती वेतनचे दर हे मृत्यु नंतर १० वर्षांनी किंवा वयाची ६५ वर्ष जे अगोदर घडेल ते या प्रमाणे दर बदल करुन निवृत्ती वेतन अदा करणे आवश्यक आहे. त्यानुसार दर बदल केलेले नाही. त्यामुळे ४३ निवृत्ती वेतन धारकांना

रु.३३,२५,७२५.००/- एवढया रक्कमेचे अती प्रदान झालेले आहे. ज्यादा प्रदान करण्यात येत असलेले कुटुंबनिवृत्तीची वसुली करण्यात यावी.

वसुल पात्र रक्कम रु. ३३,२५,७२५.००/-

**परिच्छेद क्रमांक ०८ :- सक्षम प्राधिकारी यांची सक्षम मंजुरी न घेता परस्पर सुधारीत निवृत्तीवेतन व कुटुंबनिवृत्ती वेतन लागु केले जात असले बाबत.**

१. निवृत्ती वेतन धारक श्री. प्रमोद एम.साळवी यांचे निवृत्ती वेतन तपासेले असता श्री.साळवी हे मयत झाले असुन त्यांना कुटुंबनिवृत्ती श्रीमती पल्लवी प्रमोद साळवी यांना सुरु असुन सदर पेन्शन आदेशात श्री. प्रमोद एम. साळवी यांचा मृत्यु कधी झाला त्याची नोंद नाही. कुटुंबनिवृत्ती श्रीमती पल्लवी प्रमोद साळवी यांना कधी पासुन मंजुर केले त्याची नोंद नाही, कुटुंबनिवृत्ती वेतन निश्चिती केलेली नाही. कुटुंबनिवृत्ती आवश्यक असलेले कागदपत्रे सदर नस्तीत आढळुन आलेली नाहीत. कुटुंबनिवृत्ती वेतन सुरु करताना सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी दिसुन येत नाही.

२. श्री.कन्हालाल जेठालाल पारेख, श्रीम. मनिषा आहुजा, श्री.मधुकर रामचंद्र कमळाकर, श्री. लाल टी.चंदाणी यांचे निवृत्ती वेतन आदेश तपासले असता खालील प्रमाणे उणीवा आढळुन आल्या.

सुधारीत वेतन निश्चिती आदेश प्राप्त झाल्या नंतर निवृत्ती शाखा कडुन परस्पर सुधारीत निवृत्ती वेतन निश्चिती आदेश प्राप्त न करताच सुधारीत निवृत्ती वेतन लागु करण्यात येत आहेत. तसेच त्या संदर्भात कोणतीही नोंद घेण्यात आलेली नाही किंवा सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी नाही. सक्षम अधिकारी यांची मंजुरी न घेता सुधारीत निवृत्ती वेतन आदेश काढणे किंवा फरक अदा करणे ही गंभीर बाब आहे. तरी योग्य पडताळणी करुन अनुपालन सादर करावे.

# राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना

**परिच्छेद क्रमांक ०९:-** राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना या विभागाचे सन **२०१७-१८** याआर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येते.

१] प्रमाणक क्र.२५५ दि. ४/६/२०१७

शासन निर्णय क्र. एनयुएल-२०१४ /प्र. क्र. १०४२ / नवि-३३, मंत्रालय मुंबई ४०००३९ दि. २८ ऑगस्ट २०१४ नुसार उपांग ०१, ३.३.१ मधील ब द्वित्तीयस्तर वस्तिस्तर संघ नियमानुसार नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तथापी विभागाने सादर केलेल्या नस्तीत प्रदान करण्यात आलेली १] स्त्रिशक्ती वस्तीस्तर संघ व २] राजरत्न वस्तीस्तर संघ. यांनी उपरोक्त नियमानुसार सहाय्यक संस्थानिबंधक यांच्या मार्फत नोंदणीकृत असल्याचे कोणतेही कागदपत्र नस्तीत आढळून आलेले नाही. त्यामुळे सदर योजनेचा लाभ पात्र वस्तीस्तर संघ यांना देण्यात आला किंवा नाही याची पडताळणी लेखापरिक्षणास होत नाही.

सदर बाबीवर झालेला खर्च आक्षेपाधिन आहे.

**परिच्छेद क्रमांक १०:- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना या विभागाचे सन २०१७-१८ याआर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येते.**

१) सदर विभागातील सन २०१७-१८ या अर्थिक वर्षा चे सहा. प्रकल्प अधिकारी व व्यवस्थापक वर्ग तसेच समुदाय संघटक यांच्या मानधनाची देयके तपासली असता सदर देयकातुन व्यवसाय कराची कपात केल्याचे दिसुन येत नाही.

१] प्रमाणक क्र.२४२ एकुण रक्कम रुपये १,९०,०००/-

२] प्रमाणक क्र.२४७ एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

३] प्रमाणक क्र.२५४ एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

४] प्रमाणक क्र.२६७ एकुण रक्कम रुपये ९६,१२९/-

५] प्रमाणक क्र.२७१ एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

६] प्रमाणक क्र.२८० एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

७] प्रमाणक क्र.३०३ एकुण रक्कम रुपये ९२,९०४/-

८] प्रमाणक क्र.३१० एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

९] प्रमाणक क्र.३१३ एकुण रक्कम रुपये १,२०,०००/-

१०] प्रमाणक क्र.३१४ एकुण रक्कम रुपये १,६८,३८७/-

११] प्रमाणक क्र.३१५ एकुण रक्कम रुपये ५३,४७२/-

१२] प्रमाणक क्र.३२२ एकुण रक्कम रुपये १,९०,०००/-

२) बचत गटांना फिरता निधी वितरीत करताना तयार करण्यात येणाऱ्या प्रमाणकांवर उपायुक्तांची स्वाक्षरी घेवुन देयक सादर करणे गरजेचे असताना सदर देयके सादर करताना उपायुक्त अथवा विभाग प्रमुखयांच्या स्वाक्षरी शिवाय देयके सादर करण्यात आलेली आहेत.

**३) सदर विभागातील रोख नोंदवही तपासली असता सदर नोंदवहीत प्रत्येक महिन्याच्या अखेरीस गोषवारा तयार करुन त्यावर सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेवुन प्रमाणीत केल्याचे दिसुन येत नाही.**

४) सदर विभागातील कर्मचारी यांना नेमुन दिलेले उद्‌दिष्ट व केलेले साध्य या कामाचा अहवाल सादर केल्यानंतर सदर अहवाल कोणत्याही सक्षम अधिकारी (प्रकल्पअधिकारी) यांनी प्रमाणीत केल्याचे दिसुन येत नाही.

**परिच्छेद क्रमांक ११:- राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान योजना या विभागाचे सन २०१७-१८ या अर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येते.**

१) प्रमाणक क्र. ३११a दि.६/१०/२०१७ रोजीचे प्रवासभत्ता व इतरअनुज्ञेय खर्च याबाबत उपलब्ध केलेल्या प्रमाणकात मिटींगसाठी उपस्थित राहण्या संदर्भात प्रवास करण्यासाठी मा.वरिष्ठांचा कार्यादेश मंजुर करुन घेतलेला नाही.

२) लेखा परिक्षणाच्या वेळी असे निदर्शनास आले की कर्मचारी यांचे मानधन बँके मार्फत अदाई करण्यात येत आहे. तथापी सदरचे देयक अदा केले बाबतचे रजीस्टर ठेवुन त्यात कर्मचाऱ्यांच्या महसुल मुद्रांक रु.०१ /-स्वाक्षऱ्या घेतलेल्या दिसुन येत नाही. त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झालेले आहे व कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कराची वसुली सुध्दा करण्यात आलेली नाही.

तरी सबब बाबींवर होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ होत नाही.

# सामान्य प्रशासन विभाग

**परिच्छेद क्रमांक १२:- सामान्य प्रशासन विभागातील काही ठरावीक सेवा पुस्तकांचे लेखापरिक्षण केले असता खालील प्रमाणे सेवा पुस्तकात त्रुटी अढळुन आल्या.**

१] गट विमा योजना , भविष्य निर्वाह निधी , कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान याबाबतचे नामनिर्देशन स्विकृत करुन तसे मुळ सेवा पुस्तकात नोंदी घेणे आवश्यक आहे. तशा प्रकारे नोंदी सेवा पुस्तकांत आढळून येत नाही.

२] मराठी भाषा / हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण अथवा परिक्षे पासुन सुट दिली असल्यास तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आल्याचे दिसुन येत नाही.

३] अधिकारी –कर्मचारीयांनी शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २००० /प्र .क्र. ५ / २००१ / २०० / ३९ दि. ३०/१०/२००२ अन्वये संगणक परिक्षा {MSCIT} उत्तीर्ण होणे अथवा परिक्षे पासुन सुट मिळाली असल्यास तशी नोंद सेवा पुस्तकात घेणे आवश्यक आहे , परंतु अशा नोंदी सेवा पुस्ताकात दिसुन येत नाहीत.

४] मागास वर्गीय प्रवर्गातील अधिकारी -कर्मचारी [ SC,ST,NT,OBC] यांचे शासन निर्णया प्रमाणे संबंधीत विभागाकडून जात पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. जर काही कर्मचाऱ्यांची जात पडताळणी होऊन तसे प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झाल्यास तशी नोंद सेवा पुस्तकात घेण्यात यावी .

तरी याबाबत लेखा खुलासा सादर करण्यात यावा पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करण्यात यावे.

**परिच्छेद क्रमांक १३:-** सेवा पुस्तकांतील नोंदीतील अनियमितते बाबत.

१] श्री.एकनाथ कान्हु हरड, मजुर यांचे सेवा पुस्तक तपासले असता दि.१/७/२०१८ पासुन पुढील अर्जित रजांची नोंद सेवा पुस्तकात दिसुन येत नाही.

२] श्री. अशोक नथु जाधव यांचे सेवा पुस्तक तपासले असता दि.१/७/२०१५ पासुन पुढील अर्जित व परावर्तीत रजांची नोंद सेवा पुस्तकात दिसुन येत नाही.

३] नारायण रिसवाल ,सुरक्षा रक्षक यांचे सेवापुर्स्तक तपासले असता दि.१/१/२०१६ ते दि. ३०/०६/२०१६ पर्यंत शिल्लक अर्जित रजा १४५ असुन दि.१/७/१६ ते दि. ३१/१२/२०१६ या कालावधीतील रजांची नोंद सेवा पुस्तकात घेतली असता एकुण रजांची नोंद चुकीची घेण्यात आलेली दिसुन येते.

४] दिपा साहेबराव सावळे , माळी यांचे सेवापुस्तक तपासले असता दि.०१/०७/२०१८ रोजी वेतन वाढ चुकीची दिसुन येत आहे. दि.१/०७/२०१७ रोजी मुळ वेतन ८५९० + महागाई भत्ता ३१०ग्रेड=८९००,ग्रेड वेतन १६००आहे. परंतु दि. ०१ /०७ /२०१८ रोजी मुळ वेतन ९५५० असे सेवा पुस्तकात नोंदविण्यात आले आहे. सदरची वेतन वाढ चुकीची आहे. सदर व्यक्ती ही दि.०१/०७/२०१८ पासुन अतिरिक्त वेतन अदा करण्यात येत आहे. सदर व्यक्तीस दि.०१/०७/२०१८ रोजी १२ वर्षाचा कालावधी देखील पूर्ण झालेला नाही, तरी सदर व्यक्तीस दोन वेतनवाढ कोणत्या नियमानुसार अदा करण्यात आल्या याबाबत खुलासा करावा.

५] हरी एल. भोंगडे व बळीराम बाबुराव जाधव ,सुरक्षा रक्षक ,यांचे सेवापुस्तक तपासले असता सन २०१६ पासुन सन २०१८ पर्यंत च्या आकारण्यात आलेल्या वेतन निश्चीतीवर मा. उपायुक्त यांची स्वाक्षरी दिसुन येत नाही.

# प्रभाग समिती कार्यालय-१

**परिच्छेद क्रमांक १४:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील नियम क्र. २ नुसार लेखा परिक्षणास तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने प्रभाग समिती कार्यालयाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

१] लेखा परिक्षण विभागा मार्फत प्रभाग समिती कार्यालय १ यांना लेपवि /९९/१९, दि.१३/०६/२०१९ रोजी लेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सुचीत करण्यात आले होते सबब सदर विभागाने लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रभाग समिती कार्यालय स्तरावरील जमा होणाऱ्या रकमेचा व मुख्यालयात जमा करण्यात आलेल्या रकमेबाबत साक्षंता निर्माण होते.

२] प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत किती अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

# प्रभाग समिती कार्यालय-२

**परिच्छेद क्रमांक १५:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील नियम क्र. २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने प्रभाग समिती कार्यालयाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

१] लेखा परिक्षण विभागा मार्फत प्रभाग समिती कार्यालय २ यांना लेपवि /९९/१९, दि.१३/०६/२०१९ रोजी लेखे उपलब्ध करुन देण्याबाबत सुचीत करण्यात आले होते सबब सदर विभागाने लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रभाग समिती कार्यालय स्तरावरील जमा होणाऱ्या रक्कमेचा भरणा मुख्यालयात जमा करण्यात आलेल्या रकमेबाबत साक्षंता निर्माण होत.

२] प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत किती अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत. याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

# प्रभाग समिती कार्यालय-३

**परिच्छेद क्रमांक १६:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील नियम क्र. २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने प्रभाग समिती कार्यालयाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

१] प्रभाग समिती कार्यालय ३ येथिल सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षणास अभिलेख्यांमध्ये फक्त पावती पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत . सदर विभागाकडून भरणा नोंदवही उपलब्ध करुन देण्यात आली नाही. सबब प्रभाग समिती कार्यालय ३ अंतर्गत किती रक्कम वसुल करण्यात आली व किती रकमेचा भरणा मनपा निधीत करण्यात आला याचा बोध होत नाही.

सबब बाब ही गंभीर स्वरुपाची आहे. तरी याबाबत लेखी खुलासा सादर करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करण्यात यावे.

२] प्रभाग समिती कार्यालया अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाच्या कालावधीत किती अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत . याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही.

३] पावती पुस्तकांची साठा नोंदवही लेखा परीक्षणास प्राप्त न झाल्याने प्रत्याक्षात किती पावती पुस्तके मुख्यालयाकडून प्रभाग कार्यालयास प्राप्त झाली होती, किती पावती पुस्तके वापरण्यात आली व किती पावती पुस्तके शिल्ल्क आहेत याबाबतचा ताळमेळ घेता आला नाही.

# प्रभाग समिती कार्यालय-४

**परिच्छेद क्रमांक १७:-** प्रभाग समिती कार्यालयातील सन **२०१७-१८** या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्यासाठी पावती पुस्तके तपासली असता खालील प्रमाणे अनियमितता दिसुन येत आहे.

१] पावती पुस्तक क्र.३०२ पावती क्र. ३०१७० , रोहन हेमराज गणवीर यांचे मार्फत विवाह नोंदणी प्रमाणपत्राचे शुल्क रु.५०/- आकारण्यात आले आहे . परंतु सदर विषयानुसार इतर पावत्यांमध्ये विवाह नोंदणी प्रमाणपत्राचे शुल्क २५०/- रु. ऐवढे आकारल्याचे दिसुन येत आहे. एकाच विषयाच्या बाबत दोन वेगवेगळया प्रकारे शुल्क कसे आकारण्यात येते याबाबत खुलासा करावा .

२] सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे कॅश बुक क्र.३ तपासले असता सदर नोंदवही सक्षम अधिकाऱ्यां मार्फत प्रमाणित करण्यात आलेली दिसुन येत नाही.

३] पावती पुस्तक क्र.०५ पावती क्र.४९६ दि.१३/११/२०१७ रोजी श्री. हरदास ठारवानी यांच्या कडून माहिती अधिकारा अंतर्गत रु.२१० वसुल करण्यात आले होते, परंतु सदर रकमेचा भरणा महानगरपालिकेच्या तिजोरीत केल्या बाबतची नोंद कॅश बुक मध्ये दिसुन येत नाही.

सबब सदर पैशाचा भरणा आजतागायत करण्यात आला अथवा नाही याबाबत साक्षंकता निर्माण होत आहे. सदर बाबही गंभीर स्वरुपाची असुन अशा प्रकारे पैशांचा अपहार होत असल्या बाबत निदर्शनास येत आहे. तरी योग्य तो खुलासा करावा.

४] प्रभाग समिती कार्यालयात साठा नोंदवही उपलब्ध झाली नसल्यामुळे आता पर्यंत भांडार विभागा मार्फत किती पावती पुस्तके मागवली ? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला याचा बोध होत नसुन सदर बाबींची विचार गांभिर्याने करण्यात यावा.

# अग्निशमन विभाग

**परिच्छेद क्रमांक १८:-** अग्निशमन विभागाचे सन **२०१७-१८** या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.अशस/ १४०७ / ३६०७ / २११ दि.३१/०८/२००९ मधील परिच्छेद क्र.३ अन्वये सर्व मंजुर पदे तात्काळ भरुन अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवायचा आहे.

१] उल्हासनगर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.६५ दि.८/०९/२०११.

२] उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.४१ दि. ६/०९/२०१४.

३] उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.२९ दि. १९/१०/२०१८.

वरील ठरावां नुसार अग्निशमन विभागात एकुण ६० फायरमनच्या मंजुर पदां पैकी केवळ ०९ पदे कार्यरत असुन एकुण ५१ पदे रिकत आहेत . तरी अग्निशमन विभाग कार्यक्षम ठेवणे करीता महानगरपालिके कडून योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**परिच्छेद क्रमांक १९:-** अग्निशमन विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

१] कॅश बुक मध्ये पावती पुस्तकांची नोंद घेताना अनुक्रमे न घेता एकत्रित रित्या १०० पावत्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच कॅश बुक सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्रमाणीत करण्यात आलेले दिसून येत नाही.

२] कॅश बुक मध्ये नोंद असलेले पावती पुस्तक ३६१ लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

३] विविध व्यवसायाकरीता अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला घेणे करीता प्रथमवेळी रु१०००/- व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षी नुतनीकरणाकरीता रु.५००/- इतके शुल्क आकारणे आवश्यक आहे. उल्हासनगर मनपा क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यवसाय मालकांकडे अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला घेणेबाबत नोटीस व तद्नंतर नुतनीकरण करण्याकरीता नोटीस पाठवून त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमाचा तपशिल बाबातचे लेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

**परिच्छेद क्रमांक २०:-** अग्निशमन विभागाचे सन **२०१७-१८** या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील १३ अन्वये आकारण्यात आलेल्या किमान शुल्क १% दराने वार्षिक शुल्क आकारणे आवश्यक आहे. मनपा क्षेत्रातील किती इमारतींना अग्निशमन विभागाने ना-हरकत दाखला दिला आहे. तसेच किती इमारत धारकांनी वार्षिक शुल्काची रक्कम मनपा खाती जमा केली आहे? याबाबत अभिलेख लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. अभिलेखे उपलब्ध न झाल्यामुळे वार्षिक शुल्क भरणा न केलेल्या इमारतींकडून वसुलपात्र रकमेची पडताळणी करता आली नाही.

# पाणी पुरवठा विभाग

**परिच्छेद क्रमांक २१:- पाणी पुरवठा विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.**

**पाणी पुरवठा विभागातील पाणी शुध्दीकरण रसायन खरेदी बाबत**

पाणी पुरवठा व जल-मल नि:सारण विभागामार्फत पाणी शुध्दीकरण रसायन खरेदी लेखाशिर्षांतर्गत झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | प्रमाणक क्र. / दिनांक | तपशिल | देयकाची स्थुल रक्कम | सुरक्षा रक्कम | आय-कर वजाती | कामाचा विमा | उपकर | निव्वळ देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६५/१०/८/२०१८ | टी.सी.एल. पावडर पुरवठा करणे बाबत. [मे.हर्षल टेक्नीक्स] | ७८४०० | ३९२० | १५६८ | ---- | ---- | ७२९१२ |

| अ.क्र. | कामाचा तपशिल | |
|---|---|---|
| १ | ठेकेदाराचे नाव | मे.हर्षल टेक्नीक |
| २ | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ७८,४००/- |
| ३ | कार्यादेश क्रमांक | ६६१/ दि.१०/०७/२०१८ |
| ४ | बिलाचा प्रकार | प्रथम व अंतिम देयक |
| ५ | काम पूर्ण दिनांक | ३१/०७/२०१८ |

पाणी पुरवठा विभागा मार्फत उपलब्ध केलेल्या लेख्या वरुन खालील बाबी निदर्शनास येतात

१] उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखंस/१०८८/२५१२ उदयोग२६ दि.०२/०१/१९९२ नुसार दरपत्रके / निविदा मागवुन खरेदी प्रक्रिया करणे आवश्यक असतांना पूर्वी ज्या कंत्राटदाराकडून खरेदी करण्यात आली होती त्याच कंत्राटदाराला कार्यादेश देवून खरेदी करण्यात आल्याचे दिसुन येते.

२] महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कोकण विभाग यांच्या दरसुचीनुसार टि.सी.एल पावडरची खरेदी करण्यात आली आहे अथवा नाही याचा बोध होत नाही.

३] खरेदी करण्यात आलेल्या टि.सी.एल पावडरचा गुणवत्ता अहवाल लेखा परीक्षणासाठी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या जंतुनाशक पावडरचा गुणवत्ते बाबत सत्यता पडताळणी करता येत नाही.

४] खरेदी करण्यात आलेली टि.सी.एल पावडरची नोंद साठा नोंदवहीत घेणे आवश्यक आहे. तशी नोंद घेण्यात आलेली साठा नोंदवही तपासणी करीता उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या व वापरण्या करीता वितरित केलेल्या जंतुनाशक पावडरच्या साठयाबाबत सत्यता पडताळणी करता आलेली नाही.

५] सदर पुरवठादार शासनमान्य परवानाधारक असल्याचे कागदपत्रे तपासणी करीता उपलब्ध झाले नाहीत.

६] महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता ,२०११ मधील नियम १३४ अन्वये कंत्राटी पध्दतीने काम करण्यात आले असतील त्याबाबतीत अंदाजित खर्च रु.२०००० /- पेक्षा अधिक असले तर कंत्राटदारास मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये आवश्यक असलेल्या मुद्रांक कागदावर कंत्राटाच्या अटी व शर्ती नमुद करुन आणि तो त्या अनुसरण्यास कसूर करील तो दंडास पात्र ठरेल व अशा दंडाच्या शर्ती असलेला करारनामा करणे आवश्यक असेल अशा सुचना नुसार कंत्राटदारासोबत करारनामा

करण्यात आला अथवा नाही याबाबतची कागदपत्रे लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत.

**परिच्छेद क्रमांक २२:- पाणी पुरवठा योजनांची साध्यता तपसाणीसाठी आवश्यक दस्तऐवज अनुपलब्धते बाबत.**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सार्वजनिक व खाजगी उपयोगासाठी आवश्यक असणारा पुरेसा पाणी पुरवठा योग्य व वाजवी दरात उपलब्ध करुन देणे तसेच त्यासाठीचे व्यवस्थापन देखभाल व गरजेनुसार नवीन काम हाती घेणे हे महानगरपालिकेला बंधनकारक आहे.

वरील तरतुदी नुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात २०१७-१८ या वर्षात पाणी पुरवठा विषयक कोणत्या योजना राबविण्यात आल्या याबाबत तपशील सादर करण्यात आलेला नाही.

१) एकुण नविन जलवाहिनी संख्या, लांबी व व्यास व त्यावरील करण्यात आलेला खर्च.

२) एकुण नवीन व जुने जलकुंभ व त्यावरील एकुण खर्च.

३) टँकरद्वारे पाणी पुरवठया वरील एकुण खर्च.

४) एकुण नळ जोडणी केल्याची संख्या.

५) नवीन पाणी मीटर व जुने पाणी मीटर यांची एकुण संख्या.

६) केंद्र पुरस्कृत J.N.N.U.R.M.(Water Supply) योजने अंतर्गत सुरु झाल्या पासुन २०१८ अखेर पर्यंत झालेले एकुण प्रदान रक्कम.

७) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (M.I.D.C.) यांना देय असलेली एकुण थकीत रक्कम.

याबाबत मोजमाप पुस्तिका,पत्रव्यवहार टिप्पण्या उपलब्ध करुन न दिल्याने सदर बाबतचे लेखा परिक्षण करता आलेले नाही.

**<u>परिच्छेद क्रमांक २३:-</u>** उल्हासनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील वसुली निरीक्षक यांनी त्यांच्या कडे जमा होणाऱ्या रकमा बाबतचे लेखा परिक्षण करीता पावती पुस्तके, पावती पुस्तकातील पावत्या संबंधीत चलने लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाहीत.

दस्ताऐवज उपलब्ध करुन न दिल्याने सदर बाबतचे लेखा परिक्षण करता आलेले नाही. सबब वसुल करण्यात आलेली रक्कम व भरणा करण्यात आलेली रक्कम यांचा ताळमेळ बसविता येत नाही.

**परिच्छेद क्रमांक २४:- पाणी पुरवठा विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे त्रुटी आढळून आल्या.**

१) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत एकुण किती नळ जोडण्या करण्यात आलेल्या आहेत? पाणीपट्टी थकबाकीदारांना काढण्यात आलेल्या नोटीसा, जप्ती/अटकावणी व संबंधीत पाणीपट्टी थकीतदारांन कडून वसुल करण्यात आलेली रक्कम. याबाबत केलेल्या कार्यवाही बाबत कोणत्याही प्रकारचे अभिलेखे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत.

२) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील एकुण थकीत पाणीपट्टी रक्कम रुपये १,९८,७४,९४,७९०.९७ असुल वसुल करण्यात आलेली पाणी पट्टी रक्कम रु.१,९६,५४,७९७.९ इतकी आहे. सबब बाकी पाणीपट्टी रक्कम रु.१९६,७८,३९,९९३.८८ असुन सदरी थकीत वसुली बाबत पाणी पुरवठा विभागाकडून कोण्यात्या प्रकारची उपाययोजना केल्याचे निदर्शनास येत नाही. सबब थकीत वसुली मुळे उल्हासनगर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्या बाबत निदर्शनास येत आहे.

# स्थानिक संस्था कर विभाग

**परिच्छेद क्रमांक २५:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने स्थानिक संस्था कर विभागाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

**स्थानिक संस्था कर विभागाचे सन २०१७-१८ याआर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्या करीता अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी १] जा.क्र. उमपा / लेपवि / ९९ / २०१९ दि.१३/०६/२०१९ २] जा.क्र. उमपा / लेपवि / १४१ / २०१९ दि.१४/११/२०१९ ३] जा.क्र. उमपा / लेपवि / १५५ / २०१९ दि.१७/१२/२०१९ नुसार लेखी मागणी करुनही उपलब्ध करुन देणेत आलेले नाही. लेखा परीक्षणास लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.**

१] लेखे तपासणीसाठी उपलब्ध न झाल्या मुळे नियमानुसार अनामत रक्कम घेतल्याची व वार्षिक विवरण न भरलेल्या संस्थांकडून शास्ती वसुल करुन मनपा निधीत जमा झाल्याची पडताळणी करता आली नाही.

२] जकात बंद झाले त्यावेळी थकबाकी किती होती व आतापर्यंत किती वसुल करण्यात आली, किती शिल्लक आहे याचा बोध होत नाही.

३] मानधन तत्वावर किती अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली? नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकारी /कर्मचारी वर्ग याचा महानगरपालिकेस फायदा होत आहे? अथवा मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे याबाबत बोध होत नाही.

# विधी विभाग

**परिच्छेद क्रमांक २६:-**

१) विधी विभागाची सन **२०१७-१८** पर्यंत एकुण किती प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत तसेच किती प्रकरणे निकाली निघालेली आहेत? किती प्रकरणे प्रलंबित आहेत याबाबतची माहिती लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

२) म.न.पा.ची बाजु मांडण्यासाठी नियुक्त केलेल्या वकिलांची नावे , त्याची फी याबाबतचा महासभेचा ठराव लेखा परिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही.

# कर विभाग

**परिच्छेद क्रमांक २७:-** कर विभागाचे सन २०१७-१८ चे लेखा परिक्षणासाठी अभिलेखे व दस्तऐवज उपलब्ध करुन न दिलेबाबत

कर आकारणी नोंदवही लेखापरिक्षणासाठी उपलब्ध न करुन दिल्यामुळे महानगरपालिकेच्या हद्दीतील एकूण मालमत्ता व त्याचे करयोग्य मुल्य तसेच वसुल केलेला कर याबाबतचे लेखापरिक्षण करता आले नाही.

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०५ मधील २ नुसार**

शहरातील सर्व इमारतींची व जमिनींची यादी.

१) प्रत्येक इमारतीचे व जमिनीचे करयोग्य मुल्य.

२) प्रत्येक इमारतीवर/जमिनीवर बसविण्यात योग्य असलेला मालमत्ता कर व कर देण्यास प्रथम: जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नांव.

३) अशी इमारत संपूर्णत: किवा तिच्या काही भागाकरिता सुट दिली असल्यास त्याबाबतची कारणे.

४) कलम १३४, १३५ अन्वये कोणत्याही इमारतीस/ जमिनीस पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करुन आकार बसविण्यात आला असेल तर अंश पाणीपट्टीची रक्कम .

कर आकारणी मागणी नोंदवहीत वरील माहिती समाविष्ट असणे आवश्यक आहे. सदरची मागणी पुस्तके प्रभाग निहाय स्वतंत्र ठेवून सर्वाचे मिळून एक आकारणी पुस्तक ठेवण्यात यावे.

कर विभागाला दोन वेळेस पत्र देवुनही वरील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील एकूण मालमत्ता, त्यांचे भोगवटादार व त्या मालमत्तेचे कर योग्य मुल्य, वसुल केलेला कर इत्यादींचे लेखापरिक्षण करता आले नाही

१) जा.क्र.उमपा/लेपवि/९९/२०१९ दि.१३/०६/२०१९

२) जा.क्र.उमपा/लेपवि/१२८/२०१९ दि३०/०८/२०१९

३) जा.क्र.उमपा/लेपवि/१३८/२०१९ दि१४/१२/२०१९

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे

**परिच्छेद क्रमांक २८:-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने कर विभागाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

कर विभागाचे सन २०१७-१८ चे लेखा परिक्षणासाठी अभिलेखे व दस्तऐवज उपलब्ध करुन न दिलेबाबत, **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०५ मधील २ नुसार**, कर विभागाचे सन २०१७-१८ चे लेखा परिक्षण करण्यासाठी सन २०१७-१८ या कालावधीत वॉर्डाना व इतर विभागांना वितरित केलेले कोरे पावती पुस्तके व दर्शनीमुल्य असलेले पावती पुस्तके तसेच विक्रीमूल्य असलेले फॉर्म/चलन यांचा तपशिल उपलब्ध करुन देणेबाबत पत्र दिलेले आहे. तरीही ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, त्यामुळे किती पावती पुस्तके उपलब्ध झाली? किती पुस्तकांचा कोणाला दिली? किती बाकी राहिली? याचा ताळमेळ होत नाही.

कर विभागाचे सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाचे लेखा परिक्षण करण्याकरिता खालील अभिलेखे/माहिती मागविण्यात आली होती पण ती उपलब्ध झाली नाही, त्यामुळे लेखा परिक्षण करण्यात आले नाही .

१.महानगरपालिका हद्दीत एकूण मालमत्तांची संख्या त्यापैकी मालमत्ता कराच्या कक्षेत येणा-या मालमत्तांची संख्या.

२.अनधिकृत मालमत्तांच्या संदर्भात केलेल्या दंडात्मक कारवाईचा तपशिल.

३.मालमत्तांचे निवासी , व्यापारी व इतर वर्गीकरण (संख्या).

४.सर्वाधिक कर योग्य मूल्य (एन.आर.व्ही) असणा-या १० व्यापारी मालमत्तांची यादी व संबंधित संचिका उपलब्ध करुन देणे बाबत

५.एकूण मोबाईल टॉवरची संख्या, त्यापैकी मालमत्ता कर भरणारे मोबाईल टॉवरची संख्या , सर्वाधिक कर भरणारे १० टॉवरच्या संचिका देणे बाबत.

६.सन २०१७-१८ मूल्य निर्धारण केलेल्या मालमत्तांची यादी उपलब्ध करुन देणे बाबत.

७.न्यायप्रविष्ठ असल्यामुळे थकबाकी असलेल्या १० सर्वाधिक मोठया मालमत्तांची संचिका उपलब्ध करुन देणे बाबत.

८.जा.क्र.उमपा/लेपवि/९९/२०१९ दि.१३/०६/२०१९

९.जा.क्र.उमपा/लेपवि/१२९/२०१९ दि.३०/०८/२०१९

१०.जा.क्र.उमपा/लेपवि/१३९/२०१९ दि.१४/१२/२०१९

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक २९:-**

कर विभागातील सन २०१७-१८ चे लेखा परिक्षण केलेअसता R.V, Right Information, R.T.C., Show Tax या द्वारे वसुल केलेल्या रकमा उशीराने भरलेले दिसून येते.

| पावती पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक | पावती वसुल केलेला दिनांक | रोखपालाकडे भरलेला दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १० | ९०१ ते ९२६<br>९२७ ते ९४२ | २१/०४/१७<br>२१/०४/१७ | २७/०४/१७<br>२७/०४/१७ | १३०००<br>८००० |
| ११ | १०४५ ते १०५८<br>१०५९ ते १०६० | २९/०४/१७<br>१६/०५/१७<br>१८/०५/१७<br>०६/०६/१७ | १७/०६/१७ | ३१६५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १०६१ ते<br>१०८८<br>१०८९ ते<br>११०० | | | |
| ११ | १००१ ते<br>१०४४ | २६/०४/१७ते २९/०४/१७ या<br>दरम्यान वसुल केले आहेत | ०४/०५/१७ | २४६०० |
| १६३ | १६२५२ ते<br>१६३०० | २६/०९/१७ ते २९/०९/१७ | ०३/१०/१७ | २४२३८ |
| ४२८ | ४२७८३ते<br>४२८००<br>४२७८५ ते<br>४२८०० | २९/०३/१७ ते ३०/०३/१७ | ०५/०४/१७ | १०००० |
| ४२९ | ४२८७४ ते<br>४२८९५ | ०१/०४/१७,०५/०४/१७,०६/०४/१<br>७,०७/०४/१७<br>या दरम्यान वसुल केले आहेत | ११/०४/१७ | २५०३६ |
| ४२९ | ४२८९६<br>४२८९७<br>४२८९८<br>४२८९९<br>४२९०० | ०७/०४/१७<br>०७/०४/१७<br>१०/०४/१७<br>१०/०४/१७<br>१०/०४/१७ | १५/०४/१७ | २४८००<br>५००<br>३२<br>८४००<br>२८०० |
| १२ | ११०१ ते<br>१२०० | ०६/०६/१७,<br>०७/०६/१७,०८/०६/१७ | २०/०६/१७ | ४९३०८ |

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे.

# सार्वजनिक बांधकाम विभाग

**परिच्छेद क्रमांक ३०:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने नगर रचना विभागा कडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्याकरिता अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी....

१.जा.क्रउमपा/लेपवि/९९/२०१९ दि.१३/०६/२०१९

२. जा.क्रउमपा/लेपवि/११३/२०१९दि.१९/०७/२०१९

३.जा.क्रउमपा/लेपवि/१४०/२०१९ दि.१४/११/२०१९

४.जा.क्रउमपा/लेपवि/१४७/२०१९ दि.०७/१२/२०१९

नुसार लेखी मागणी करुनही उपलब्ध करुन देणेत आलेले नाही लेखा परिक्षणास लेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे खालील बाबी तपासणी करता आलेले नाही.

निर्मल एम.एम.आर.डी.योजना

१) योजनेचा मंजूर ठराव व इतर दस्ताऐवज

२) प्रशासकीय मंजुरी व अंदाजपत्रक

३) तांत्रिक मंजुरी त्यासंबंधातील दरसुची व दर पृथकरणे

४) एम.एम.आर.डी. ए. यांची मंजुरी त्या अनुषंगाने योजनेचे दस्ताऐवज

५) निविदा नस्ती , निविदा अटी व शर्ती, प्राप्त निविदा, निविदा मंजुरी प्रस्ताव, निविदा मंजुरी ठराव, त्या अनुषंगानेचे दस्ताऐवज

६) कार्यादेश व करारनामे त्या अनुषंगाने दस्ताऐवज

७) सुधारित प्रशासकीय मंजुरी व सुधारीत अंदाजपत्रक , सुधारित तांत्रिक मंजुरी व त्या संबंधित जिल्हा दरसुची पत्रक व पृथकरणे त्या अनुषंगाने दस्ताऐवज

८) सुधारित निविदा नस्ती फी, निविदा अटी शर्ती, प्राप्त निविदा मंजुरी प्रस्ताव निविदा मंजुरी ठराव त्या अनुषंगाचे दस्ताऐवज

९) सुधारित कार्यादेश व सुधारित करारनामा, सुधारित ठरावाची प्रत

१०) एम.एम.आर.डी. ए. कडून प्राप्त अनुदोन कर्जे यांचा तपशिल त्यानुसार पाठविलेली उपयोगिता प्रमाणपत्र, योजनेची रोखवही

११)वेळोवेळी एम.एम.आर.डी.ए. यांना सदरील कामाच्या प्रगतीचा अहवाल पाठविलेबाबत पत्रके त्यांचा दस्ताऐवज त्यामुळे लेखा परिक्षणास सदरील खर्चाची सत्यता पडताळणी करण्यात आलेली नाही.

# वैदयकिय आरोग्य विभाग

**परिच्छेद क्रमांक ३१:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने वैदयकिय विभागाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.**

वैदयकिय आरोग्य विभागाचे सन २०१७-१८ चे लेखा परिक्षण करण्याकरिता अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी १. जा.क्र.उमपा/लेपवि/९९/२०१९ दि. १३/०६/२०१९ २. जा.क्र.उमपा/लेपवि/११३/२०१९ दि.१९/०७/२०१९.

तरी वारंवार पत्र देवुन कोणत्याही प्रकारचे अभिलेखे/दस्तऐवज लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन दिले नाही, त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

महानगरपालिकेचे दवाखान्याचे पावती पुस्तके व कॅश बुक तपासले असता वैदयकिय अधिका-याची स्वाक्षरी पावत्यांवर दिसून आली नाही, कॅश बुकामध्ये सुध्दा स्वाक्षरी दिसून आली नाही, तसेच काही पावत्यांवर दिनांक नमुद करण्यात आलेले नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे.

# नगररचना विभाग

**परिच्छेद क्रमांक ३२:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने नगर रचना विभागाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे

नगररचना विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्याकरिता नगररचना विभागास अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी....

१.जा.क्र.उमपा/लेपवि/९९/२०१९, दि१३/०६/२०१९

२.जा.क्र.उमपा/लेपवि/११३/२०१९, दि.१९/०७/२०१९

३.जा.क्र.उमपा/लेपवि/१४०/२०१९, दि.१४/११/२०१९

रोजी पत्र देउन सुध्दा अभिलेखे/दस्तऐवज उपलब्ध करुन न दिल्यामुळे नगररचना विभागातील पावती पुस्तक साठा नोंदवही लेखा परिक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून प्राप्त झाली? किती पावती पुस्तकांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्लक आहेत? या बाबत पडताळणी करता आली नाही. नगररचना विभागाअंतर्गत नोंदणीकृत एकूण किती वास्तुशिल्पकार/ स्थापत्य अभियंता आहेत? त्यांनी परवान्यांचे नुतनीकरण केले किंवा कसे? तसेच नुतनीकरण केले नसल्यास नुतणीकरणापोटी किती रक्कम वसुलपात्र आहे? इत्यादीबाबत अभिलेख लेखापरिक्षणा करिता उपलब्ध झाले नाहीत. तरी या बाबत खुलासा करावा, त्यामुळे लेखा परिक्षण करता आले नाही.

# मालमत्ता विभाग

**परिच्छेद क्रमांक ३३:-** मालमत्ता विभागातील सन २०१७-१८ चे लेखा परिक्षण सुरु केले असता खालील अनियमितता दिसून येते

मालमत्ता विभागातील भाजी मार्केटचे गाळयांव्दारे वसुली केली जाते. ती रोखपालकडे उशीरा भरणा केलेली दिसून येते.

| पावती पुस्तक क्रमांक | पावती क्रमांक | वसुल केलेला दिनांक | रोखपालकडे भरणा केलेला दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ४०३ | ४०२७५ | २१/०४/२०१७ | ०६/११/२०१७ | ५०० |
| ४५७ | ४५६३२ | २१/०८/२०१७ पावती व्दारे ११००वसुल केलेले दिसून येतात | २१/०८/२०१७ | ५०० |
| १५३ | १५३८८ १५३८९ | २०/११/२०१७ | रोखपालकडे नोंद केलेली दिसून येत नाही कॅश बुकमध्ये मालमत्ता व्यवस्थापकाची स्वाक्षरी दिसून आली नाही | ६००० ३५४० |
| १५७ | १५६६३ | १९/१२/२०१९ | १३३११० कॅश बुकमध्ये नोंद करताना खाडाखोड केलेली दिसून येते त्यामुळे कोणती रक्कम भरलली याचा ताळमेळ करता येत नाही | १३७११० |

पावती पुस्तक क्रमांक २२० लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झाले नाही त्यामुळे त्या पुस्तकातील रक्कमांची पडताळणी करता आली नाही.

स्टॉक रजिस्टर तपासले असता सक्षम अधिकारी/कर्मचारी यांची स्वाक्षरी दिसून आली नाही.

पावती पुस्तक क्रमांक ४०३ या पुस्तकाची नोंद दि.०८/१२/२०१७ व दि.१८/०४/२०१८ रोजी भांडार विभागाकडून एकाच पावती पुस्तकाची दोन वेळा नोंद केल्याची दिसून येते.

पावती पुस्तक व रोखवही तपासले असता उशीरा भरणा केलेला दिसून येतो.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे.

# शिक्षण मंडळ विभाग

परिच्छेद क्रमांक ३४:-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५ मधील २ नुसार लेखा परिक्षणात तपासणी करीता अभिलेखे उपलब्ध करुन देणेची जबाबदारी असताना लेखी मागणी करुनही अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्याने शिक्षण मंडळ विभागाकडून अधिनियमांच्या तरतुदीचे उल्लंघन झाले आहे.

शिक्षण मंडळ विभागाचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण करण्या कारीता अभिलेखे उपलब्ध करुन देण्यासाठी १] जा.क्र. उमपा / लेपवि / ९९ / २०१९ दि.१३/०६/२०१९ २] जा.क्र. उमपा / लेपवि / ११३ / २०१९ दि.१९/०७/२०१९ नुसार लेखी मागणी करुनही उपलब्ध करुन देणेत आलेले नाही.

# माहिती व तंत्रज्ञान विभाग

**परिच्छेद क्रमांक ३५:-** माहिती व तंत्रज्ञान विभागाचे सन २०१७-१८ चे अंतर्गत लेखापरिक्षण सुरु केले असता खालील अनियमितता दिसून येते.

नागरी सुविधा केंद्राचे सन २०१७-१८ चे अंतर्गत लेखा परिक्षणासाठी अभिलेखे व दस्तऐवज उपलब्ध करुन न दिलेबाबत.

१)मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम **१९४९** कलम **१०५(२)** नुसार

नागरी सुविधा केंद्राचे सन २०१७-१८ चे अंतर्गत लेखा परिक्षणासाठी नागरी सुविधा केंद्र विभागाने एकुण खरेदी करण्यात आलेल्या संगणकांची संख्या तसेच निकामी झालेल्या संगणकांची एकुण संख्या व त्यांची केलेली विक्रीबाबत तसेच विविध प्रकारचे कार्टेजेस, टोनर्स यांची खरेदी अथवा निर्लेखन निविदेव्दारे केली अथवा किरकोळ स्वरुपात खरेदी व निर्लेखन केली आहे याबाबतचे दस्तऐवज उपलब्ध झाले नाही .

संदर्भिय पत्रान्वये

१. जा.क्र. उमपा/लेपवि/९९ दि.१३/६/२०१९

२. जा.क्र. उमपा/लेपवि/११३ दि.१९/७/२०१९

३. जा.क्र. उमपा/लेपवि/१४० दि.१४/११/२०१९

दस्तऐवज व अभिलेखे यांची वारंवार मागणी केली असता लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे सदर विभागाचे लेखा परिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# अनधिकृत बांधकाम विभाग

**परिच्छेद क्रमांक ३६:-** अनधिकृत बांधकाम विभागाचे सन २०१७-१८ चे लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध झाले नसलेबाबत.

अनधिकृत बांधकाम विभागाचे व पदपथ विभागाचे सना २०१७-१८ चे लेखापरिक्षण करीत असतांना अनधिकृत बांधकाम विभागाचे व पदपथ विभागातील पावती पुस्त्क साठा नोंदवही लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झली नाही. त्यामुळे किती पावती पुस्तके भांडार विभागाकडून घेण्यात आली, किती पावती पुस्त्कांचा वापर करण्यात आला? व किती पावती पुस्तके शिल्ल्क आहेत? याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच सन २०१७-१८ या कालावधीत पदपथ विभागाकडून एकूण किती रोखवही वापरात होत्या? या बाबत अभिलेखे प्राप्त झाले नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# विद्युत विभाग

**परिच्छेद क्रमांक ३७:-** विदयुत विभागाचे सन २०१७- १८ या कालावधितील स्टॉक बुक व इश्यु बुक रजिस्टर तपासले असता खालील अनियमितता दिसून येते.

१.विदयुत विभागात स्टॉक बुक रजिस्टर व इश्यु बुक रजिस्टर यामध्ये वस्तू आणली व दिल्याची नोंदी केलेली असते स्टॉक बुक रजिस्टर नं.१ मध्ये – दि. २४/८/१७ रोजी २५० Watt MVL Holder हे १२ नग- धनराज चव्हाण यांच्या नावाची नोंद केलेली आहे परंतू इश्यु बुक रजिस्टर मध्ये ते त्यांना दि ४/९/१७ रोजी दिल्याची नोंद आहे

२.Electronic blast For Rang १०० ते ३०० Walt १८*४० १*३६ - स्टॉक बुक रजिस्टर नं.१ मध्ये दि २६/७/१७ रोजी १० नग किशन पावसे यांच्या नावाची नोंद आहे परंतू इश्यु बुक रजिस्टर मध्ये दि २६/७/१७ ला धनराज चव्हाण यांना १० नग दिल्याची नोंद आहे. तसेच २७/०७/१७ रोजी ०८ नग एम. व्ही. दिंडे यांचे नावाची नोंद आहे परंतू इश्यु बुक रजिस्टर मध्ये ते दि २७/७/१७ रोजी किशन पावसे यांना दिल्याची नोंद आहे.

३.दि ६/७/१७ रोजी इश्यु बुक रजिस्टर मध्ये एम.व्ही. डिंडे यांना १० नग दिल्याची नोंद आहे परंतू स्टॉक बुक रजिस्टर नं.१ मध्ये दि.६/७/१७ ची नोंदच आढळून येत नाही

४.१०० A.M.P. kit -kat - स्टॉक बुक रजिस्टर नं.१ मध्ये दि १/१०/१७ रोजी १० नग एम.व्ही.डिंडे अशी नोंद आहे परंतू इश्यु बुक रजिस्टर मध्ये दि.१/१०/१७ ची नोंदच आढळून येत नाही

५.स्टॉक बुक रजिस्टर नं.२ मध्ये - 6 sqmm 2 core Aluminium service wire दि ८/०१/१८ रोजी ५ नग – एम.व्ही.डिंडे अशी नोंद आहे परंतू गेटपास व इश्यु बुक रजिस्टर मध्ये दि.९/०१/१८ रोजीची नोंद आहे.

६.Telephone २ pair wire- Stock Book Reg.२– मध्ये दि ७/९/१७ रोजी धनराज चव्हाण – १० नग- अशी नोंद आहे परंतू इश्यु बुक रजिस्टर मध्ये दि.७/०९/१७ ची नोंदच आढळून येत नाही तसेच दि.७/०९/१७ चा गेटपास ही नाही .

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# महिला बालकल्याण विभाग

**परिच्छेद क्रमांक ३८:-** महिला बाल कल्याण विभागा कडुन उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भाखंस-२०१४/प्र.क्र.-८२/भाग-III/उदयोग-४, दिनांक १डिसें,२०१६ खरेदी करताना कार्यवाही होत नसले बाबत.

१) महिला बाल कल्याण समितीने सन २०१७-१८ मध्ये महिला व बाल कल्याण समिती अंतर्गत विविध प्रकारचे योजना राबविण्यात आले. यावेळी महिला व बाल कल्याण समितीतर्फ उल्हासनगर शहरातील गरिब व गरजु विधवा निराधार/ परितक्त्या/आर्थिक द्रष्टया दुर्बल महिलांना स्वयंरोजगारासाठी कॅटरींग साहित्य संच बाटप करणेबाबत योजले. महिलांना स्वयंरोजगारासाठी आवश्यक बाजारभाव दर मागविण्यासाठी महिला व बालकल्याण समितीव्दारे दि. ७/११/२०१७ अन्वये महापालिकेच्या बेबसाईडवर दरपत्रके मागविण्यात आले आहे. सदरील खरेदीसाठी उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भाखंस-२०१४/प्र.क्र.-८२/भाग-III/उदयोग-४दिनांक १ डिसें,२०१६ अन्वये निविदा सवंबंधी जाहिरात ही एक राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बंधनकारक आहे तसेच शासन निर्णय दि. १डिसें,२०१६ अन्वये खरेदी समितीची स्थापना करणे आवश्यक आहे व वार्षिक खरेदी ३,००,००० पेक्षा जास्त असेल तर निविदा चौकशी वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. असे असतांना महिला व बालकल्याण विभागाकडून या बाबतची कार्यवाही झालेली दिसून येत नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# सार्वजनिक आरोग्य विभाग

**परिच्छेद क्रमांक ३९:-** सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७- १८ या कालावधीत कॅश बुक व पावती पुस्तक तपासणी केली खालील अनियमितता दिसून येते

१) सार्वजनिक आरोग्य विभागाचे कॅश बुक चेक केले असता वसूल केलेले पावत्यांची नोंद कॅश बुक मध्ये केलेली आहे लेखा विभागात वसूल केलेले रक्कम भरणा करतांना कॅशबुक मध्ये नोंदी केलेली आहे परंतू त्या नोंदी खाली उप-आयुक्त (आरोग्य) यांची स्वाक्षरी दिसून येत नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ४०:-** सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७- १८ या कालावधीत भांडार साहित्य नोंद रजिस्टर तपासणी केले असता खालील अनियमितता दिसून येते

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७-१८ चे जंतूनाशक/ किटकनाशक भांडार साहित्याचे नोंद रजिस्टर तपासले असता फिनाईल गोळयांचा (डांबरगोळया) Stock मागिल २०१६-१७चे जंतुनाशक औषध भांडार नोंद रजिस्टर वरुन दि. १/४/२०१७ रोजी ३५०k.g. दाखविलेला आहे. त्याचे वितरण करत असतांना श्रीम. कमलेश बुग्बर यांना २० गोळया दिल्या असता ३३० शिल्लक असतांना रजिस्टर मध्ये ३२० दाखविण्यात आले आहे. व त्यामुळे पुढील सर्व नोंदीमध्ये तफावत येत आहे त्यामुळे शेवटची शिल्ल्क ही ४३ असतांना ती रजिस्टर मध्ये ५२ अशी दाखविण्यात येत आहे.

तरी यामधिल तफावतींचा खुलासा करण्यात यावा.

**<u>परिच्छेद क्रमांक ४१:-</u>** सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७- १८ या कालावधीत साधन खरेदीमधिल अनियमिततेबाबत.

सफाई साहित्य व संरक्षणार्थ साधने खरेदीमध्ये गॅलवनाईजड बादल्या,बांम्बु, हातरुमाल, रबरी हातमौजे, साबण, फावडे,गोवाब्रुम , वगैरे, असे २३ प्रकारे सफाई साहित्य व संरक्ष्णार्थ साधने खरेदीसाठी शासनाने वेळोवेळी दर करारानुसार साहित्य खरेदी करण्याचे निर्देश दिलेले आहेत, परंतु घनकचरा विभागाने सफाई साहित्य व संरक्षणार्थ साधने खरेदीसाठी शासनाचे कृषी विभाग व आरोग्य विभाग यांच्या दरकरानुसार खरेदी न करता जाहिर निविदा मागवून सफाई साहित्य व संरक्षणार्थ साधने खरेदी केलेली आहे. याबाबत अनियमितता आढळून येते.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**<u>परिच्छेद क्रमांक ४२:-</u>** सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७- १८ या कालावधीत साफ-सफाई करणे कामातील अभिलेखे उपलब्ध झाले नसलेबाबत.

महापालिका क्षेत्रात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यासठी अभिकर्त्यांची नमणुक करुन पावर स्विपिंग मशिनव्दारे साफसफाई करण्या बाबतची कागदपत्रे लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिले नाहीत.

तसेच पावर स्विपिंग मशिन सोबत असलेले सफाई कामगारांचे हजेरी पुस्तके, वेतन पट तसेच विमा उतरविल्याचे कागदपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही .

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ४३:-** सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१७- १८ या कालावधीत अभिलेखे लेखा परिक्षाणास उपलब्ध झाले नसले बाबत.

सार्वजनिक आरोग्य विभागातील जंतूनाशक/ किटकनाशक/ दुर्गंधीनाशके / अळीनाशके/डासनाशके इत्यादी औषधे व सफाई कामगारांसाठी शहरातील स्वच्छता/ साफसफाईसाठी आवश्यक साहित्य पुरवठा होणेबाबत स्वच्छता निरिक्षकांकडून मागणी केली जाते. सदर मागणी विभागावार, क्षेत्रानिहाय वापर, त्याची आवश्यकता, वापराचे परिमाण व प्रमाणे त्याप्रमाणे या खरेदी संदर्भातील मागील वापर नोंदवही, कमाल व किमान साठा पातळी त्याची मार्गदर्शक तत्वे याबातची माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

वरील जंतुनाशके व इतर साहित्यांच्या भांडारात नोंदवहया ठेवण्यात आलेल्या आहेत. ही जंतुनाशके विविध स्वच्छता निरिक्षक यांना वाटप केल्यानंतर वाटप केलेल्या जंतुनाशकांची वा रसायनांची फवारणी अथवा त्यांचा उपयोग कुठे व कसा करण्यात आला याचा अहवाल लेखापरिक्षणासाठी प्राप्त झाला नसल्यामुळे खरेदी करण्यात आलेल्या जंतुनाशकांचा वा रसायनांचा विनियोग व वापर जनहितार्थ झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# सुरक्षा विभाग

**परिच्छेद क्रमांक ४४:-** सुरक्षा विभागाचे सन २०१७-१८ चे कॅश बुक तपासले असता खालील अनियमितता दिसून येते

सुरक्षा विभागातील पावती पुस्तक व कॅश बुक तपासले असता सुरक्षा विभागामार्फत माहिती अधिकार अंतर्गत आकारणी केलेली रक्कम लेखा विभागात भरणा केलेली आहे.

पावती पुस्तक क्र. २४१ या मधिल पावती नं २४००१ ते २४००८ पर्यंतची कॅश बुक मध्ये नोंद करुन भरणा केलेली आहे परंतू कॅश बुक मध्ये नोंद करतांना पावती पुस्तक नंबर, पावती नंबर व दिनांक यांचा उल्लेखच केलेला नाही. त्यामळे कॅशबुक मध्ये केलेली नोंद ही कोणत्या पावतीची आहे याचा सहज बोध होत नाही. त्यामुळे त्यांच्या कामकाजाता सुसुत्रीपणा दिसून येत नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# भांडार विभाग

**परिच्छेद क्रमांक ४५:-** भांडार विभागाचे सन २०१७-१८ चे साठा व वाटप नोंदवही तपासले असता खालील अनियमितता दिसून येते

भांडार विभागाचे सन २०१७-१८ चे साठा व वाटप नोंदवही तपासले असता त्यामध्ये महानगरपालिकेतील वर्ग क व ड च्या लाभार्थी कर्मचायांना गणवेश वाटप केलेले आहे. प्रत्येक विभागातील शिपाई कर्मचारी व सफाई कामगार यांना गणवेश वाटप केले आहे. परंतू प्रभाग समिती मधिल स्त्री व पुरुष यांना गणवेष वाटप केले असतांना त्यांच्या नावांची नोंद घेतलेली नाही किंवा त्यांची नावे नमूद केलेले नाही

तसेच नोंदवहीच्या शेवटी खरेदी केलेले गणवेष कापड किती कर्मचायांना वाटप झाले तसेच किती गणवेष कापड शिल्ल्क राहीले याबाबतचा गोषवारे काढण्यात आलेला नाही

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे

**परिच्छेद क्रमांक ४६:-** भांडार विभागाचे सन २०१७-१८ चे गणवेश कापड खरेदीतील अनियमितेबाबात

महानगरपालिकेतील क व ड लाभार्थी कर्मचायांच्या गणवेश कापड खरेदीची निविदा जाहिरात राजपत्रात निविदा प्रसिध्द न करता स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात आली आहे तसेच गणवेशाचे कापड महाराज्य वस्त्रोउदयोग महामंडळ महाटेक्स्कॉम महाराष्ट राज्य् यंत्रमार्ग महामंडळ यांचेकडून तपासणी करुन तपासणी अहवाल ठेवणे आवश्यक आहे परंतु तशी तपासणी केलली दिसून येत नाही तसेच त्याबाबतची नोंद

रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली दिसून येत नाही त्यामुळे विहत दर्जाचे कापड पुरवठा केल्याची खात्री होत नाही

त्यामुळे उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र भाखंस२०१४प्रक्र.-८२/भाग.III उदयोग-४दिनांक १डिसें.२०१६ च्या नियमांचे पालन झाले आहे किंवा नाही याची खातरजमा होत नाही

साहित्य वितरण वाटप रजिस्टर मध्ये वर्ष अखेर मागिल वर्षाचा एकुण साहित्य साठा तसेच एकुण साहित्याचे झालेले वाटप व राहिलेल्या शिल्लक वस्तूच्या नोंदीचा गोषवारा काढण्यात आलेला नाही .

वर्षाअखेर राहिलेल्या शिल्ल्क साहित्याची नोंद ही दुस-या वर्षात आरंभीची शिल्लक म्हणून नोंद घेणे आवश्यक असतांना त्याची नोंद घेतल्याचे दिसून येत नाही

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे

**परिच्छेद क्रमांक ४७**:- भांडार विभागाचे कामकाजातील अनियमिततेबाबत.

भांडार विभागा मार्फत महापालिकेच्या विविध विभागांना अधिकारी पदाधिकारी यांच्या कार्यालयात त्यांच्या मागणीप्रमाणे वस्तुंचा पुरवठा केला जातो भांडार विभागात वस्तुचे वाटप करत असतांना वस्तू निहाय जसे स्टेशनरी फर्निचर वर्गीकरण करुन साठा नोंद रजिस्टर मध्ये नोंदी घेतल्या जातात भांडार विभागातून ज्या पध्दतीने साहित्यांचे वितरण केले जाते त्याप्रमाणे विभा निहाय रजिस्टर ठेवल्यास प्रत्येक विभागास वर्ग निहाय त्यांना पुरविण्यात आलेल्या वस्तूंची नोंद व संख्या कळेल त्यामुळे अनावश्यक वापरावर निर्बंध येईल मागणी प्राप्त झाल्यावर यापुर्वी कोणकोणत्या व किती वेळेस वस्तू पुरविण्यात आल्या आहेत? तसेच एकाच वस्तूच्य मागणीची किती वेळेस पुनरावृत्ती होत आहे याचा बोध होऊन त्याबाबतची विचारणा संबंधित

विभागाकडे केल्यास प्रत्येक विभाग त्याला पुरविण्यात आलेल्या वस्तूंचा काळजी पूर्वक वापर करुन  वस्तूचा अपव्यय होणार नाही याबाबत दक्षता घेईल.

महापालिकेचे विविध विभाग अधिकारी पदाधिकारी यांच्या दालनातील जुन्या वस्तू अथवा फर्निचर उदा खुर्च्या टेबल  कपाटे सोफे इत्यादीचे निर्लेखन करणे ऐवजी त्यांची दुरुस्ती रंगरंगोटी करुन त्या वस्तू पुर्नउपयोगात आणणे शक्य असल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे

# वाहन विभाग

**परिच्छेद क्रमांक ४८:-** वाहन विभागाचे सन २०१७- १८ या कालावधितील कॅश बुक व पावती पुस्तक तपासणी केली असता खालील अनियमितता दिसून येते.

१. वाहन विभागामार्फत वेगवेगळया सोयी-सुविधासाठी वाहने पुरविले जातात. त्यासाठी त्यांचे वेगवेगळे प्रकारचे शुल्क आकरण्यात येतात. त्यामुळे आकारण्यात आलेले शुल्क पावती पुस्तकाव्दारे वसुल करुन ते रोजच्या रोज महापालिकेत लेखाविभागात भरणा करणे गरजेचे आहे परंतू वाहन विभागाचे पावती पुस्तके व कॅशबुक चेक केले असता आकारणी केलेले शुल्क हे वेळच्या वेळी न भरता ते ४-५ किंवा ८-१५ दिवसानंतर भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे. तरी याबाबतची अनियमितता दिसून येते.

२. तसेच शुल्क आकारण्यात आलेल्या पावत्यांवर कोणत्याही कर्मचारी / अधिका-याची सही नाही.

३. कॅश बुक एम.एच.-८८९ मध्ये पावती पु.-७२ मध्ये पावती नं. ७१४८ रु. ७००/- आणि पा.नं ७१४९ - रु. ७००/- ची भरणा करतांनाची नोंद घेण्यात आली आहे परंतू त्याखाली विभाग प्रमुखाची स्वाक्षरी नाही.

४. कॅश बुक एम.एच.-८८९ मध्ये पावती पु.-७२ मध्ये पावती नं. ७१५४ दि.१८/४/१८ रोजी ३५०/- वसुल करुन कॅशबुकला भरणा केली आहे परंतू कोणत्या तारखेला भरणा केली याचा बोध होत नाही. तरी याबाबतची अनियमितता दिसून येते

५. कॅश बुक एम.एच.०५-६३४ मध्ये पावती पुस्तक ३६७ पा.न. ३६६३४ दि. १७/१/१७ रु. १५०/-, पा.न. ३६६३५ दि. १३/०१/१७ रु.१५०/- तसेच पा.नं. ३६६३६ दि. १२/१/२०१७ रु.१५०/- यांची भरणा दि. १०/०२/२०१७ रोजी म्हणजेच ०१ महिना उशिराने करण्यात आली आहे.

६. कॅश बुक एम.एच.०५-८८७ मध्ये पावती पुस्तक ४२५ पा.न. ४२४३७ रु. ७००/- , पा.नं ४२४३८ रु.१५०/- तसेच पा.नं-४२४४२, पा.नं. ४२४४३ या पावत्यावर कधी

वसूली केली आहे ती दिनांक नमूद केलेली नाही . त्यामुळे याबाबतची अनियमितता दिसून येते.

७.पावती पुस्तक ४२५ पा.नं.४२४४२ रु. ७०० या पावतीची कॅश बुक ८८७ या मध्ये नोंद केली आहे, परंतू लेखा विभागात जमा झाल्याचे कॅशिअरचा सही शिक्का नाही, त्यामुळे लेखा विभागात पैसे जमा झाल्याची खात्री होत नाही.

८. पावती पुस्तक ७१ पा.नं. ७०७६ सुचिता पगारे यांचे रु. ३५०/- ची पावती फाडलेली आहे. परंतू कॅश बुक ८८७ मध्ये दि. २८/०९/२०१७ रोजी त्यांचे नावे रु. १५० जमा केल्याची नोंद आहे.

९. वाहन विभागाचे कॅश बुक व पावती पुस्तकांची तपासणी केली असता या बाबतची अनियमितता दिसून येते.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ४९:-** वाहन विभागाचे सन २०१७- १८ या कालावधितील स्कंद नोंद वही (लॉग बुक) तपासणी केली खालील अनियमितता दिसून येते.

महानगरपालिकेतील वाहन विभागात प्रत्येक वाहनासाठी वेगवेगळया ठेवलेल्या स्कंद नोंदवहया (लॉग बुक) तपासले असता गाडयाचे रिडींग बंद असल्यामुळे १५० किलोमिटर मागे १५ लिटर डिझेल अशी गणना केलेली आहे. त्यामुळे गाडी एफ-९६६९या लॉग बुक मध्ये गाडी ७ एम ते ३.०० पीएम पर्यंत धावल्याचे नमुद केलेले आहे. परंतू वाहन एकुण किती तास व किती किलोमिटर धावली या किलोमिटर्सची संख्या नोंदविण्यात आलेली नाही. एकुण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक व दिनांक अशा नोदी घेण्यात आल्या नाहीत. तसेच प्रवासाचे नियोजन नोंदविण्यात आलेले नाही वरील नियमानुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्यात आल्या नाही. एम.एच.-०५ एन-७४ लॉग बुक मध्ये ऑगस्ट २०१७ व नोव्हेंबर २०१७ च्या महिन्याच्या शेवटी वाहनाची एकुण झालेली सरासरी धाव तसेच वार्षिक सरासरी धाव यांचा गोषवारा

काढण्यात आलेला नाही . वाहनांचे मॉडेल वर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे वाहनांची प्रतिलिटर इंधनामागे किलोमीटर धाव योग्य असल्याची तपासणी करता आली नाही.

इंधन खर्चाचे देयके वाहन विभागामार्फत लेखा शाखेकडे पारित होण्यासाठी सादर केली जातात. परंतू अशा देयकाची कार्यालयीन प्रत वाहन विभागाकडे स्वत:कडे ठेवलेली नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ५०:-** वाहन विभागाचे सन २०१७- १८ या कालावधितील हिस्ट्री बुक (इतिहास पुस्तक) तपासणी केली असता खालील अनियमितता दिसून येते.

वाहन विभागातील हिस्ट्री बुकची (इतिहास पुस्तक) तपासणी केली असता हिस्ट्री बुक मध्ये वाहनांचे मॉडेल वर्ष, इंजिन चेसी क्रमांक, विमा इ. बाबींची माहिती नोंदविण्यात आलेली नाही. तसेच आरटीओ पासिंग आरसी बुकची प्रत इ. बाबतच्या नोंदी काही हिस्ट्री बुकमध्ये घेण्यात आलेल्या नाहीत

गाडी नं-MH-०५ BH-९२७७ या गाडीची Disel Capacity किती याबाबत हिस्ट्री बुक तपसणी केले असता यामध्ये नोंद घेतल्याचे दिसून येत नाही.

हिस्ट्रीशीट (इतिहास पुस्तिका) यांची तपासणी केली असता अशी नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रतिमहा वाहनाच्या दुरुस्ती चा गोषवारा तसेच वाहनावरती झलेल्या खर्चाची बेरीज घेउन मेळ घेण्यात आलेला नाही त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावर दुरुस्ती साठी झालेल्या खर्चाची लेखापरिक्षणास खात्री झाली नाही.

तसेच नोंद वहिवर वाहन प्रमुख यांनी तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी केलेली नाही.

वाहन विभागातील हिस्ट्री बुक (इतिहास पुस्तक) तपासणी केली असता याबाबत नोंदींची अनियमितता दिसून येते.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ५१:- वाहन विभागाचे सन २०१७-१८चे अंतर्गत लेखापरिक्षण सुरु केले असता खालील अनियमितता दिसून येते.**

वाहन विभागात वाहनांच्या वापरासंबंधी नोंदवही ठेवणेबाबतची अनियमितता दिसून येते.

महानगरपालिकेतील अधिका-यांसाठी भाडेतत्वावरील वाहने एक वर्षाच्या कालावधी करिता मागविलेली असतांना पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देवुन किती? व कोणत्या प्रकारची वाहने ठेक्याने किती दिवसासाठी मागविण्यात आली? व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिका-यांनी केला? याबाबतचा संपूर्ण तपशील ठेवणे बाबत निविदा अटी व शर्तीनुसार स्वतंत्र नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना अशी नोंद वही लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाली नाही. त्यामुळे त्याबाबतचे लेखापरिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

**परिच्छेद क्रमांक ५२:-** वाहन विभागातील वाहनांच्या दुरुस्तीचे अभिलेखे उपलब्ध झाले नसलेबाबत.

महापालिकेच्या मालकीची अवजड व हलकी वाहने असुन प्रस्तूत वाहनाच्या दुरुस्तीवरील खर्चाबाबतचे अभिलेखे तपासणी साठी उपलब्ध झाले नाही. त्यामुळे वाहन विभागातील वाहनांच्या दुरुस्तीवरील झालेला खर्च हा ठरवून दिलेल्या मर्यादेत अथवा मर्यादेपेक्षा जास्त झाला आहे? किंवा नाही? याबाबतचे लेखापरिक्षण करता आले नाही.

तसेच शासन नियमानुसार वाहनांची दुरुस्ती ही अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधुन दरपत्रके मागवून करण्यात आली की, स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेजवाल्याकडून करुन घेण्यात आलेली आहे. याबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षण विभागात उपलब्ध झाले नसल्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

तरी याबाबत सविस्तर लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

# दक्षता व उपाय

लेखापरिक्षण विभाकडुन वेळोवेळी प्राथमिक आक्षेप लागू करण्यात आलेले आहेत. बहुतांशी आक्षेपांची पूर्तता होण्यासारखी असून देखील त्याच्याकडे संबंधित विभागांशी योग्य व पुरेसे लक्ष न दिल्यामुळे आक्षेपित वसूलपातृ रक्कम वेळेत वसूली होऊ शकली नाही. आक्षेपित वसूलपात्र रक्कम वसूल करणेबाबत प्रयत्न करणे आवश्यक आहे. अग्रीम रक्कमेचे समायोजित विहित कालावधी करणे आवश्यक आहे. तरी अग्रीमाच्या समायोजनासाठी तातडीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. मुख्य लेखापरिक्षण विभाकडून कार्यवाहीतील त्रुटी लेखा परिक्षण आक्षेपात दाखवून देऊन सुध्दा पुन्हा पुन्हा त्याच स्वरुपाच्या अनियमितता आढळुन येतात. त्याअर्थी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांकडे पुरेशा गांभीर्याने पहात नसल्याचे दिसुन येते. प्रत्येक विभागास अर्धसमास आक्षेप प्राप्त झाल्यानंतर त्यांची पुर्तता तीन दिवसाचे आत करणे क्रमप्राप्त आहे, याबाबत संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे. विहित मुदतीत आक्षेपांचे अनुपालन सादर केल्यास सदरचे आक्षेप अंतिम अहवालात सामाविष्ट करावे लागणार नाहीत. लेखापरिक्षण विभागाने वेळोवेळी लागू केलेले अर्धसमास आक्षेप व पाठविणेत आलेले वार्षिक लेखापरिक्षण अहवाल संबंधित विभागाने आक्षेपांची केलेली पुर्तता याबाबत स्वंतत्र नोंदवही ठेवण्यात यावी म्हणजे प्रलंवित आक्षेपांबाबत विभाग प्रमुखांस वेळोवेळी आढावा घेवून आक्षेपांची पुर्तता करणे सोईचे होईल.

सदरच्या सूचना यापुर्वीच्या अहवालामध्ये देण्यांत आलेल्या आहेत. परंतु त्याची दखल घेतल्याची दिसून येत नाही. तरी विभाग प्रमुखांनी अर्धूसमास आक्षेपांची त्वरीत पुर्तता करुन अनुपालन अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच आतापर्यंत प्रलंबित असलेल्या आक्षेपांची पुर्तता करणेबाबत विशेष मोहिम हाती घेण्यांत यावी.

# अनुपालन...

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांचे कलम १०५ व १०६ नुसार मा. स्थायी समितीस सन २०१७-२०१८ चा लेखापरिक्षण अहवाल सादर करण्यात येत आहे.

19/05/22

(शरद देशमुख)
मुख्य लेखापरिक्षक,
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

१. मा सभापती, स्थायी समिती, उल्हासनगर महानगरपालिका

२. मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत कार्यवाहीसाठी:-

१. अतिरिक्त आयुक्त

२. उपायुक्त (सर्व)

३. विभाग प्रमुख (सर्व)

# उल्हासनगर महानगरपालिका

संदर्भ:-१) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च, २०२२

२) जा.क्र.उमपा/ आ.का./०१/२०२२,दिनांक ५ एप्रिल, २०२२ रोजीचा स्वीकृती आदेश.

विषय:- उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सन २०१७-१८ सादर करणेबाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका लेखा परिक्षण विभागाकडून श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक, श्री. अशोक मोरे, सहा. मुख्य लेखा परिक्षक, तसेच ३ लिपिक असा कर्मचारी वर्ग देण्यात आला होता. त्यामधील श्रीमती रागिनी पळशीकर, लिपिक हया १४२, विधानसभा मतदार केंद्र, कल्याण "ड" वार्डात, उल्हासनगर ४ परिसरात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी महणुन काम करीत होत्या, श्रीमती सुशिला भालचिम, लिपिक, संगणक ऑपरेटरचे काम करतात व श्रीमती पुजा पंतगे, लिपिक आवक-जावकाचे कामकाज करतात. त्यामुळे लेखापरिक्षणाचे काम निर्धारित वेळेत करता आले नाही, सामान्य प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी स्वरुपात अनुभवी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणेस कळवूनही पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. तसेचमाहे मार्च २०१९ पासुन कोव्हीड सुरु झाल्याने कोव्हीडच्या कालावधीमध्ये लेखा परिक्षणाचे काम बंद होते. व मे २०२० ते एप्रिल २०२२ पर्यंत खाजगी हॉस्पीटलचे लेखा परिक्षणाचे काम सुरु असल्याने नियमित लेखा परिक्षणास विलंब झाल्यामुळे लेखा परिक्षण अहवाल सादर करण्यास विलंब झाला आहे.

सदर सन २०१७-१८ अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल तयार असुन महापालिका अधिनियम सन १९४९ मुबंई अधिनियम क्र. ५९ चे कलम १०६ (३) नुसार सदर अहवाल मा. महापालिका आयुक्त तथा प्रशासन यांनी मान्य केलेला असुन सदर प्रस्ताव ठरावासाठी सादर करण्यात येत आहे.

प्रशासकीय ठराव क्र. - १३ दिनांक-०९/०६/२०२२

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार मी डॉ. राजा दयानिधी, प्रशासक, उल्हासनगर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे लेखा परिक्षणाने सन २०१७-१८ च्या दिलेल्या लेखा अहवालास मान्यता देत आहे.

परंतु

१) स्थानिक निधी लेखा परिक्षणा कार्यालय, कोकण भवन व महालेखापाल, मुंबई कार्यालयाच्या लेखा परिक्षण अहवालातील प्रस्तावित परिच्छेदांचे अनुपालन संबंधित विभागाने करुन अहवाल सादर करणे आवश्यक असेल

२) सदर अहवालाप्रमाणे जेथे लागू आहे तेथे संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन पुर्तता करुन घेण्याचे सामान्य प्रशासन विभागास निर्देश देत आहे.

३) सदर प्रलंबित परिच्छेदांचे विहित वेळेवर झाल्यास नियमानुसार दोषी अधिकारी/कर्मचारीवर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच यापुढे अशा त्रुटी/चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता संबंधित विभागाने घ्यावी.

वरील प्रमाणे ठराव मंजूर

(सौ.प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(डॉ. राजा दयानिधी)
प्रशासक
उल्हासनगर महानगरपालिका

**सत्य प्रति**

महानगरपालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका